सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग,

अर्थ व सांख्यिकी संचालनालय

प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

दूरध्वनी क्र. २६३८३००९/२६३८३०१६

Email ID: ddadm1.des@hotmail.com

dydiradm.des@maharashtra.gov.in

क्रमांक :- संअकमा/१४१४/२०५/प्रशा-२/४४० दिनांक: 02/05/2022

विषय :- संचालनालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची माहिती अद्ययावत करणेबाबत.

संदर्भ :- संचालनालयाचे परिपत्रक क्र.संअकमा/१४१४/२०५/प्रशा-२/१५१३,दि. २४/१२/२०१४

**परिपत्रक**

शासकीय कामकाज पार पाडत असताना संचालनालयास वारंवार अधिकारी / कर्मचाऱ्यांची सेवाविषयक माहिती तसेच वैयक्तिक माहितीचा तपशील आवश्यक असतो. उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची सेवा विषयक तसेच वैयक्तिक माहिती मागविण्यात आली होती.

२/- कोव्हीड-१९ महामारीतील लॉकडाऊन तसेच इतर नैसर्गिक आपत्तीमुळे अधिकारी / कर्मचाऱ्यांशी किंवा ते कार्यरत असलेल्या कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधणे कठीण झाले. तसेच बदली, पदोन्नती किंवा प्रशासकीय कारणास्तव कार्यालय बदलले असल्यास त्याबाबतचे संबंधित कार्यालयात रुजू झाल्याचे कार्यालयीन आदेशाच्या प्रती संचालनालयास अप्राप्त आहेत असे निदर्शनास आले आहे. सदर बाब विचारात घेऊन अधिकारी / कर्मचारी यांच्या लाभां विषयक प्रकरणांचा निपटारा वेळेत करण्यासाठी आवश्यक असलेली सेवा विषयक माहिती व वैयक्तिक माहिती अद्ययावत करण्याकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर गुगल फॉम्सची लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

३/- अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाविषयक व वैयक्तिक माहितीमध्ये बदल झाला असल्यास जसे नावात बदल, भ्रमणध्वनी क्रमांक, इ-मेल आयडी, सध्याच्या वास्तव्याचा पूर्ण पत्ता, स्वग्राम, NIC.IN किंवा GOV.IN हे वैयक्तिक इमेल आयडी तसेच सध्याच्या कार्यालयामध्ये बदल झाला असल्यास नवीन कार्यालयातील रुजू दिनांक, नवीन कार्यालयातील पदनाम, नवीन कार्यालयाचे नाव, नवीन कार्यालयाचा पत्ता हि माहिती mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर “सेवासंबंधी” टॅब मधील “संचालनालयातील अधिकारी / कर्मचारी यांनी अद्ययावत करावयाची माहिती” या शिर्षकावर क्लीक करुन “https://forms.gle/G3nhCkDxQZrJVZ5p6” या लिंक वर भरता येईल. तसेच कार्यालयात बदल

झाल्यामुळे त्या कार्यालयाचे नाव, इमेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक व पत्र व्यवहार करावयाचा असल्यास तेथिल अधिकाऱ्यांचे पदनाम हि माहिती mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर "सेवासंबंधी" टॅब मधील "अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिपत्याखालील तसेच संचालनालयाचे अधिकारी / कर्मचारी कर्यरत असलेल्या कार्यालयांचा तपशिल" या शिर्षकावर क्लिक करुन "https://forms.gle/WUrt16ojatZraXwE9" या लिंक वर भरता येईल.

४/- वरील लिंकला क्लिक केल्यास माहिती फक्त gmail या ई-मेल आयडी वरुन भरता येईल.

५/- तद्नंतर अधिकारी / कर्मचारी यांनी सदर सेवाविषयक माहिती व वैयक्तिक माहिती अद्ययावत न केल्यास त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही व त्यामुळे ते यांना देण्यात येणारे सेवाविषयक लाभांपूसन वंचित राहिल्यास / विलंब झाल्यास / प्रशासकीय प्रकरणे प्रलंबित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची राहील, याची नोंद घ्यावी.

मा. संचालकांच्या मान्यतेने.

(नि. म. प्रभुदेसाई)
उपसंचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

प्रत: अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे सर्व अधिकारी / कर्मचारी.